International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.1 Sep-Oct 2022

# महाराष्ट्रातील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**
सहयोगी प्राध्यापक, जवाहरलाल नेहरु समाजकार्य
महाविद्यालय व संशोधन केंद्र, नवीन नांदेड
Corresponding Author- डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर
DOI- 10.5281/zenodo.14870524

**गोषवारा :-**

"महाराष्ट्रात एकूण ४२ भटक्या विमुक्त जाती व जमाती आहेत. त्यापेको २८ भटक्या जमाती आहेत. या जमातीच्या पोट जातीची संख्या २०० पेक्षा जास्त आहेत त्यामध्ये संस्कृती, रुढी, परंपरा, विवाह पध्दती, अंधश्रध्दा, अंत्यविधी, व्यवसाय, भौगोलिकता इ.विविधतेमुळे अंतर्गत साम्य व भेद निर्माण झाल्याचे दिसून येते. ब्रिटिश सरकारच्या काळात इ.स. १९७१ साली गुन्हेगारी जाती व जमातीचे लोक इतर समाजापासून वेगळे झाले. या कायद्यामुळे भटक्या विमुक्त जाती व जमातीतील १९८ जाती-जमातींना गुन्हेगार जाती म्हणून जाहीर केले. पुढे सरकारने इ.स. १८९७ साली "क्रिमिनल टाईब्र सेटलमेंट ॲक्ट" पास केला. त्या कायद्याने गुन्हेगार जाती-जमातींच्या लोकांच्या वसाहती स्थापन करण्यात आल्या. गुन्हेगारी जाती-जमातींना तारेचे कंपाऊंड करुन त्यामध्ये अशा जमातींच्या भारतात ५२ वसाहती निर्माण करण्यात आल्या. त्यात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यात अशा वसाहतीचा समावेश होतो. इ.स. १८७१ चा गुन्हेगारी कायदा स्वतंत्र भारताच्या पार्लमेंटने सन १९५२ साली रद्द केल्यानंतर १९६० ला अखिल भारतीय पातळीवर गुन्हेगारी जाती-जमातीचे पहिले अधिवेशन सोलापूर येथे भरले. त्या वेळी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरूंनी वस्तुस्थिती पाहून बंदिस्त वसाहतीतील लोकांना मुक्त करण्याचे आदेश संबंधित राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दिले. तेव्हा १४ जमातींना गुन्हेगारी कायद्यातून मुक्त केले. म्हणून त्यांना विमुक्त जाती असे संबोधून स्वातंत्र्याचे नवीन क्षितिज दाखविले. त्यामुळे भटक्या विमुक्तांच्या आशा व आकांक्षा नव्याने जागृत झाल्या.

**बिज संज्ञा :-** विमुक्त जाती व भटक्या जमातीं, महाराष्ट्र, संस्कृती, रुढी, परंपरा.

**प्रस्तावना :**

प्राचीन काळी सर्व जमाती टोळया करुन राहात असत. आजही काही जमाती टोळया करुनच भटके जीवन जगत आहेत. निसर्गाची पूजा, भूत-पिशाच्यावर विश्वास, प्राण्याला बळी देण्याची प्रथा आजही अशा जमाती मध्ये चालूच आहे. त्यामुळे हा भटका समाज इतर विकसित समाजाच्या प्रवाहातून दूर झाल्याचे दिसून येते. "उदरनिर्वाह करिता निवडलेल्या किंवा वाट्यास आलेल्या व्यवसायनिमित्त किंवा उदरनिर्वाहाच्या साधनाच्या शोधात भटकत राहाणाऱ्या लोकांच्या टोळयांना भटक्या जमाती किंवा भटके असे म्हणतात."

**उद्देश :-**

1. महाराष्ट्रातील विमुक्त जाती व त्यांच्या उपजातीचे विश्लेषण करणे
2. महाराष्ट्रातील भटक्या जमाती व त्यांच्या उपजातीचे विश्लेषण करणे
3. महाराष्ट्रातील व्यवसायअधारीत भटक्या जमातीच्या प्रकारचे अध्ययन करणे

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये द्वितीय स्त्रोतांचा वापर करून शोधनिबंध लेखन करण्यात आले आहे ज्यामध्ये पुस्तके, संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, दैनिक लेख, शासकीय अहवाल इ. चा वापर करण्यात आलेला आहे.

**भटक्या जमात्तीचा अर्थ :-**

इंग्रजी मध्ये भटके/भटका या शब्दाला Nomad असे म्हणतात. हा शब्द नोमी Nomi किंवा Nomo या ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. स्वतःचे कायमस्वरुपचे घर किवा शेतजमीन नाही, परंतु गुरांचे कळप आहेत असे लोक गुरांसाठी चराऊ कुरणांच्या शोधात सतत भटकत असतात. अशाना उद्देशून Nomad शब्द वापरला जातो. हा शब्द किंवा संकल्पना फक्त जंगलात भटकंती करणाऱ्या लोकांसाठीच वापरली जात नाही. तर एकाच ठिकाणी कायमचे वास्तव्य न करता सतत किंवा वर्षांतील बराचसा काळ भटकंती करणाऱ्या लोकासाठी किंवा जमातीसाठी देखील भटका हा शब्द वापरला जातो.

**भटक्या समाजाचे प्रकार :-**

**१) अन्नशोधक भटके :-**

ही मानवाची प्राथमिक अवस्था होती. नैसर्गिक साधन संपत्तीवर उदरनिर्वाह करणाऱ्या समूहाला अन्नशोधक भटके म्हटले जाते. हे लोक फळे, कंदमुळे व मांस यांच्या शोधात भटकंती करत असे.

**२) शिकारी भटके :-**

धातूच्या आणि लाकडाच्या लवचिकपणाचा शोध लागल्यानंतर धनुष्य बाणासारखी काही हत्यारे त्यांना करता येऊ लागली व त्यापासून शिकार करणे शक्य झाले. तेव्हा पासून शिकार केलेल्या प्राण्यांचे मांस आपल्या अन्नामध्ये समावेश केला यालाच शिकारी भटके असे म्हणले जाते.

**३) चारण भटके :-**

या अवस्थेत मानवाने थोडीशी प्रगती केली. गायी, म्हशी, शेळया, मेंढ्या, घोडे व कुत्रे या प्राण्यांना मारण्याऐवजी पाळू लागले. त्यापासून दूध, लोकर, कुत्र्यापासून संरक्षण, घोडे, उंटापासून दुर्गम भागातील दळणवळणासाठी वापर यामुळे महत्त्व वाढले. पशु धर्माचे पालन करणाऱ्या समूहास चारण भटके असे म्हणले जाते.

**४) व्यापारी भटके :-**

पशुचा कळप घेऊन चारण भटके सुपीक व गवताळ प्रदेशाचा शोध घेत भटकत होते. त्यांच्या जवळीत पशुंचे रुपांतर पशुधनात झाले. पशुची खरेदी-विक्री होऊ लागली. तेथूनच एक नवीन जमात व्यापारी म्हणून निर्माण झाली त्यालाच व्यापारी भटके असे म्हटले जाऊ लागले.

**५) उत्पादक भटके :-**

शेतीच्या शोधात त्यांनी बेल, रेडे या सारख्या प्राण्यांना शेतीस जुंपले, शेतीमुळे या भटक्यांच्या जीवनाला थोडेफार स्थैर्य प्राप्क्ष झाले. तसेच गुरे व मॅंढ्या यांच्या पासून मिळणारे हाडे, कातडी, दूध व लोकर इ. वर उदरनिर्वाह करु लागले. तेव्हा हे लांक उत्पादक भटके म्हणून ओळखले जाऊ लागले.

**६) सेवाकर्म करणारे भटके :-**

आपल्या व्यवसायाव्दारे लोकांना सेवा उपलब्ध करुन देणारे भटके हे सेवाकर्म करणारे भटके म्हणून ओळखले जाऊ लागले. हे भटके लोक धान्य, मीठ आणि इतर वस्तू ज्या ठिकाणी सुलभ उपलब्ध होतील. अशा ठिकाणाहून खरेदी करुन जेथे या वस्तूची गरज आहे. तेथे विकतात तसेच दोर, चव्ढ्या, औषधे इ. कार्य करणाऱ्या लोकांनाही सेवाकर्म करणारे भटके म्हटले जाते. उदा. लमाण, बेलदार, घिसाडी, लोहार व शिकलगार इ.

**७) करमणूक/मनोरंजन करणारे भटके :-**

आपल्या व्यसायाच्या माध्यमातून लोकांचे मनोरंजन करणारे भटके जात गोंधळीः गोंधळ, जोशीः भविष्य कथन करणे, गारुडीः सर्वाचा खेड, डोंबारीः तारेवरची कसरत, नंदीवालेः बैलाचा खेळ काही लोक जादूचे खेळ करुन लोकांची करमणूक करणारे हे लोक भटके म्हणून ओळखले जातात. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती मोठ्या प्रमाणात आढळतात.

**महाराष्ट्रातील विमुक्त जाती व भटक्या जमातींची सूची :-**

महाराष्ट्र शासन समाजकल्याण, सांस्कृतिक, क्रीडा व पर्यटने विभाग, परिपत्रक क्र. सी.बी.सी. १६८४ जो.प. ५९२-१९९ बी.सी.डब्ल्यू. ५, मंत्रालय, मुंबई १९ फेब्रुवारी १९८६ च्या आधारे खालील प्रमाणे विमुक्त जाती-जमातींची सूची देण्यात येत आहे.

| अ. क्र. | विमुक्त जाती | तत्सम जाती |
|---|---|---|
| १ | बेरड | नाईकवाडी, तलवार, बाल्मिकी |
| २ | बेस्तर | सचलू, वडार |
| ३ | भामटा | भामटी, गिरणी, कामाटी, पाथरुट, टाकरी, उचले, पायलोट |
| ४ | कैकाडी | धोंतले, कोरवा, माकडवाले, पायलोट व कोरवी |
| ५ | कंजारभाट | छारा, कंजार, नाट |
| ६ | कटाक | |
| ७ | बंजारा | गोरा वंजारा, लवाडा, लांबारा, लभाणी, बरण लमाण, लवण, धाडी, ढालाया सिगारी, नावी, जोगी चंजारा, बंजारी |
| ८ | वगळले | पाल, पारधी |
| ९ | राजपारधी | गावपारची, ह्रिरण, शिकारी |
| १० | राजपूत भामटा | परसुशी, भामटा, परदेशी भामटा |
| ११ | रामोशी | |
| १२ | वडार | गाडी, वड्डार, जाती वडार, माती वडार, पाथरवट |
| १३ | वाघरी | सालाट, सलाट वाघरी |
| १४ | छप्परबंद | |
| | **भटक्या जमाती** | **पोटजाती/तत्सम जमाती** |
| १ | गोवासी | बावा, वैरागी, भारती, गिरी, गोसावी, भारती, गोसावी, सरस्वती, पर्वत, |

| | | |
|---|---|---|
| | | सागर बाण किंवा वाण, तीर्थ आश्रम, राण्यधामारी, सन्यांशी, नाथपंथी गोसावी |
| २ | बेलदार | आडे |
| ३ | भराडी | बाळ संतोषी, किगरीवाले, नाथवाबा, नाथ जोगी, नाथपंथी, डवरी गोसावी |
| ४ | भूते | भोपे |
| ५ | वगळले | |
| ६ | चित्रकथी | |
| ७ | गारुटी | |
| ८ | घिसाडी | घिसाडी लोहार / गाडी लोहार, चित्तोड, राजपूत लोहार |
| ९ | गोल्ला | गोल्लेवार, गोलेकर, गोलकर |
| १० | गोंधळी | |
| ११ | गोपाळ | गोपाळ, भोरपी, खेळकरी |
| १२ | हेळवे | हिलव |
| १३ | जोशी | बुडबुकी, डमरुवाले, कुडमुडे, मेंढगी, सरोदे, सहदेव, जोशी, सरवदे, सरोदा |
| १४ | काशी कापडी | |
| १५ | कोल्हाटी | डोंबारी |
| १६ | भैराळ | दांगड, वीर |
| १७ | मसणजोगी | सुदगढसिध्द, मसणजोगी |
| १८ | नंदीवाले | तिरमळ |
| १९ | पांगूळ | |
| २० | रावळ | राऊळ किवा रावळयोगी |
| २१ | सिक्कलगर | कटारी |
| २२ | ठाकर | |
| २३ | वैदू | वगळण्यात आले |
| २४ | वासुदेव | |
| २५ | भोई | झिंगा भोई, परदेशी भोई, राजभोई, मल्हार, गोडिया, कहार, धुरिया, कहार, किराब, मछुआ, माझी, जातिया, केवट, ढीवार, धीवर, धीमर, पालेवारख मंछेद्र, नावाडी, मान्हाव, भोई, गाढव भोई, खाडी भोई, खोर भोई, ठेवरा |
| २६ | बहुरुपी | |
| २७ | टेलारी | |
| २८ | ओतारी | ओतकर, ओतनकर, वतारी, ओझारी |
| २९ | धनगर | व त्याच्या सर्व पोट जमाती |

स्त्रोत : महाराष्ट्रातील भटका समाजः संस्कृती व साहित्य

**निष्कर्ष :-**

महाराष्ट्रात एकूण ४२ भटक्या विमुक्त जाती व जमाती आहेत. त्यापेको २८ भटक्या जमाती व विमुक्त जाती आहेत. या जमातीच्या पोट जातीची संख्या २०० पेक्षा जास्त आहेत त्यामध्ये संस्कृती, रुढी, परंपरा, विवाह पध्दती, अंधश्रध्दा, अंत्यविधी, व्यवसाय, भौगोलिकता इ.

विविधतेमुळे अंतर्गत साम्य व भेद निर्माण झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये बेरड, बेस्तर, भामटा, कैकाडी, कंजारभाट, कटाक, बंजारा, राजपारधी, राजपूत भामटा, रामोशी, वडार, वाघरी, छप्परबंद या विमुक्त जाती आहेत तर त्याच्या अनेक उपजाती आहेत. त्याचबरोबर गोवासी, बेलदार, भराडी, भूते, चित्रकथी, गारुटी, घिसाडी, गोल्ला, गोंधळी, गोपाळ, हेळवे, जोशी, काशी, कापडी, कोल्हाटी, भैराळ, मसणजोगी, नंदीवाले, पांगूळ, रावळ, सिक्कलगर, ठाकर, वैदू, वासुदेव, भोई, बहुरुपी, टेलारी, ओतारी व धनगर या भटक्या जमाती आहेत तर त्याच्या अनेक पोटजाती/तत्सम जमाती आहेत महाराष्ट्रातील भटक्या जमातीमध्ये विविध व्यवसायावर आधारीत भट्क्या जमातीचे प्रकार व उपजाती दिसून येतात

**संदर्भ सूची :-**

1. 'कारीकंटे गणपत रामराव (२०१६) मराठवाड्यातील पंचायतराज संस्थेत भटक्या विमुक्त जाती जमातीचा राजकीय सहभाग-एक अभ्यास', नांदेड अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
2. गोरे नवनाथ (२०१८) फेसाटी, पुणे अक्षर वाङ्मय प्रकाशन.

3. जाधव काशीराम कंठीराम, (२०१४), 'घुमन्तु जनाजातियो के लोकगीतो का सांस्कृतिक अध्ययन', औरंगाबाद अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, डॉ.बा.आ.म.वि. औरंगाबाद.
4. देशमुख भास्कर गुलाबराव (२०१६) 'मसनजोगी भटक्या जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन' (विशेष संदर्भः नांदेड जिल्हा), नदिड अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
5. धनगर जगतराव, (२०१५), 'धनगर जमातीतील रुढी परंपरांचा अभ्यास', जळगाव : संपा. डॉ. देसाई संभाजी, ग्रामीण समाजःकाल, आज व उद्या, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती
6. बोरसे कैलास भटा, (२०१६) 'उत्तर महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन, अमरावती अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, संत गाडगेबाचा अमरावती विद्यापीठ, अमरावती.